**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 5 | Jan 2015**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# चिपळूण तालुक्याच्या ग्रामीण भागातील दुर्लक्षीत ऐतिहासिक स्थळे

**प्रसाद सुरेश भागवत**

पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ता. गुहागर, जि. रत्नागिरी.

## प्रस्तावना –

भारताला प्राचीन ऐश्वर्यसंपन्न वारसा लाभलेला आहे. भारतभर अशी अनेक ठिकाणे विखूरलेली आहेत ज्यांना ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. ब्रिटिश काळापासून या प्राचीन ठिकाणांचा शोध घेण्याचे व त्यांचा इतिहास उजेडात आणण्याचे काम विविध पातळीवर अविरतपणे आजही सुरू आहे. अद्याप अशी अनेक ठिकाणे आहेत ज्यांच्याबाबत फार सखोल माहिती उपलब्ध नाही. भारताच्या ग्रामीण भागातील तर अनेक ऐतिहासिक स्थळे दुर्लक्षीत आहेत. यासाठी प्रस्तुत शोध निबंधात चिपळूण तालुक्याच्या ग्रामीण भागातील काही दुर्लक्षीत ऐतिहासिक स्थळांचा मागोवा घेतलेला आहे.

## चिपळूण तालुका –

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण हा एक प्रमुख तालुका आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असणारे चिपळूण हे मुंबई या राज्याच्या राजधानीपासून आग्नयेस सुमारे १७५ मैल आहे. अरबी समुद्रापासून गोवळकोटपर्यंत नौकासुलभ असलेल्या वाशिष्ठी नदीच्या दक्षिण तीरावर समुद्रापासून ४० कि.मी. आत वसलेले चिपळूण हे ठिकाण आहे. तालुक्याच्या पश्चिमेस गुहागर तालुका आणि इतिहासप्रसिद्ध दाभोळ बंदर, उत्तरेस खेड तालुका, दक्षिणेस संगमेश्वर तालुका आणि पूर्वेकडे सह्याद्रीचा घाट पसरलेला आहे. हा तालूका १७० ते ३०० उत्तर अक्षांश व ७३० ते ३६० रेखांश ह्या भौगोलिक पट्ट्यामध्ये वसलेला आहे.

सृष्टी सौंदर्यानी फुललेला आणि निसर्गरम्य देखाव्याने नटलेला चिपळूण तालुका रमणीय ठिकाणांसाठी प्रसिद्ध आहे. रत्नागिरी जिल्ह्याचे सांस्कृतिक केंद्र म्हणून चिपळूणची ओळख आहे. चिपळूणला त्याचप्रमाणे चिपळूण तालुक्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. ही माती अनेक ऐतिहासिक घटनांची साक्ष आहे. चालुक्य राजा पुलकेशी दुसरा याचे तसेच शिलाहार राजा मल्लिकार्जुन यांचे शिलालेख येथे सापडतात. त्यावरून प्राचीन इतिहासकाळात हा भाग चालुक्य व शिलाहार राजांच्या वर्चस्वाखाली होता हे स्पष्ट होते. छ. शिवाजी महाराज अनेकवेळा चिपळूणला येऊन गेले होते. विशेषतः ते परशुराम क्षेत्री मंदिरात येत असल्याची माहिती मिळते. चिपळूण तालुक्यातील कोंडमळा या गावी आपल्या नातलगांच्या घरी छ. शिवाजी महाराज जात असल्याचा उल्लेख आहे. चिपळूण तालुक्यातील 'दळवटणे' या गावी महाराजांचा लष्करी तळ होता. महाराजांनी राज्याभिषेकापूर्वी या ल्ष्करी तळाला भेट दिली होती. चिपळूण शहराजवळील गोवळकोट किल्ला आधी छ. शिवाजी महाराजांच्या ताब्यात होता. पेशवाईच्या काळात हा किल्ला आंग्रेंच्या ताब्यात होता. ब्रिटिश कालखंडामध्ये प्रशासनाचे प्रमुख केंद्र म्हणून चिपळूणची ओळख होती.

अशा या प्रसिध्द तालुक्यामधे विविध प्रकारची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या पण दुर्लक्षीत असलेल्या काही ठिकाणांची माहिती व्हावी या हेतूने सदर शोध निबंधाची मांडणी केलेली आहे.

## परशुरामचे ग्रामदैवत श्रीधावजी व जाखमाता मंदिर –

पेढेपरशुराम गावचे ग्रामदैवत श्री धावजी व जाखमाता आहे. त्यांचे प्रशस्त मंदिर परशुराम मंदिरानजीक आहे. या मंदिरासमोर पेशवेकालीन वैशिष्ट्यपूर्ण बांधणीची प्रेक्षणीय विहीर आहे. तिला 'धावजीची विहीर' असे संबोधतात. या विहीरीचे पाणी वाणगंगेत येण्यासाठी चिरेबंदी पाटाची रचना केलेली आजही पहावयास मिळते. पाटाजवळच्या पाखाडीनजीक विठ्ठल मंदिर आहे. धावजी

मंदिरापासून थोडे अंतरावर विहीरवर बांधलेले श्री दत्तमंदिर आहे. याचे नजिक बारमाही जिवंत झरा आहे. या मंदिराच्या वरील डोंगर भागात तीन गुहा आहेत. त्यापैकी एका गुहेवर बांधलेल्या छोटया कुटीत 'पटवर्धनबुवा' हे सद्गृहस्थ निवास करीत. दत्तमंदिराच्या वरच्या पायरवाडीकडे जाणाऱ्या टेकडीत गर्द वनराईत श्री पर्वतेश्वर मंदिर आहे. त्याच्या पुढील एका उंच टेकडीच्या माथ्यावर भव्य दगडी दीपमाळा आहे.

**गोंधळेचे पेशवेकालीन श्री हरिहरेश्वर मंदिर –**

चिपळूण पासून ३५ कि.मी. दूर निसर्गरम्य परिसरात विराजमान गोंधळे गावातील पेशवेकालीन श्री हरिहरेश्वर मंदिर भाविक पर्य टकांसाठी अमूल्य ऐतिहासिक ठेवा आहे. वाशिष्ठीची उपनदी असलेल्या तांबी (प्राचीन नाव ताम्रपर्णी )नदीच्या किनाऱ्यावर गोंधळे गाव वसले आहे. मंदिराच्या घुमटाच्या बाजूला कोरलेला मजूकर या मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करतो. या कोरीवलेखानुसार सदर मंदिराचे काम १६९६ मध्ये म्हणजे इ. स. १७०४ रोजी बांधलेले आहे. पेशव्यांच्या दरबारात असणाऱ्या अप्पाजी चिमणाजी गोंधळेकर यांच्या देखरेखेखाली देवळाचे बांधकाम पूर्ण झाले. त्यानंतर शके १८२६ म्हणजे इ.स.१९०४ मध्ये या शिवालयाचा जिर्णोध्दार रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने केला. या कामावर कारकून म्हणून नवारक देवकृष्ण जोशी होते. रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर गावातील कारागीर गवंडी म्हणून सेवेस होते. सखाराम गोंधळेकर, रावजी गोंधळेकर, काशिनाथ गोंधळेकर यांनी शिवलिंगावर बिल्वपत्र ठेवले. अलिकडील काळात सन २००१ मध्ये मंदिराची घुमट दुरूस्ती व सन २००५ मध्ये पुन्हा मंदिराचा जिर्णोध्दार व सुशोभिकरण करण्यााात आले. वेगवेगळया काळात मंदिराची दुरूस्ती होवूनही मंदिराचे प्राचीनत्त्व कायम असलेले बांधकामावरून दिसते.

**मंदिरातील दुर्मिळ शिवपिंड**

मंदिर गाभाऱ्यातील शिवपिंड दुर्मिळ असून तिची उंची सुमारे १ फूट तर व्यास सुमारे दीड फूट आहे. ही शिवपिंड इतकी गुळगुळीत आहे की पहाणाऱ्याचे प्रतिबिंब त्यात दिसू शकते. मंदिराच्या आख्यायिकानुसार पेशवाई अमलामध्ये नेपाळच्या राजाने पेशव्यांना शिवमूर्ती भेट म्हणून दिली होती. पेशवे दफ्तरखान्यात चाकरीस असलेले आप्पाजी गोंधळेकर यांनी सदरहू मूर्ती पेशव्यांकडून घेवून गोंधळे येथे आणून तिची प्रतिष्ठापना केली.

**अप्रतिम नंदी**

मंदिराच्या मध्य भागाच्या गाभाऱ्यात चित्तवेधक श्रीगणेश मूर्ती असून बाह्यभागात अप्रतिम नंदीची मूर्ती आहे. मंदिराशेजारीच विशाल आकारमानाची प्राचीन विहीर आहे. चिरेबंद बांधकामाच्या विहिरीस चाळीस पायऱ्या असून तिला बारमाही पाणीसाठा असतो. मंदिर परिसरात बगीचा व कारंजे, धर्मशाळा आदि सुविधा पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. दोन गाभाऱ्याची वैशिष्टयपूर्ण बांधकाम शैलीची कलात्मकता या मंदिरात आहे. मुख्य गाभारा समारे १५ मीटर उंचीचा आहे.

सदर मंदिरात प्रतिवर्षी श्रावण सोमवारी भाविकांची गर्दी असते. महाशिवरात्रीला उत्सवाचे आयोजन केले जाते. चिपळूण गोंधळे एस्.टी. बसने गुहागर मार्गवरील चिवेलीफाटा येथे उतरून खाजगी रिक्षा किंवा इतर वाहन व्यवस्थेने या गावापर्यंत जाता येते. तर पर्यायी मार्ग म्हणजे गोवळकोट दाभोळ खाडीतील जलमार्गातील नौकांमधून चिवेली बंदर धक्का येथे उतरून नंतर अन्य रस्ता वाहतूक साधनांनी पर्यटक येथे जाऊ शकतात.

**पाथर्डी येथील प्राचीन पाथरेश्वर मंदिर –**

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या पाथर्डी गावात शिवपूर्व कालीन ४५० वर्षापूर्वीचे श्री पाथरेश्वराचे महादेव मंदिर आहे. मंदिरात वैशिष्टयपूर्ण माता पार्वतीची मूर्ती आहे. या देवस्थानाच्या नावावरून गावास 'पाथर्डी' हे नाव पडले. गावाने शिवकाळही अनुभवला आहे. सहाणे जवळील ग्रामदेवता श्री भैरी देवालय हबशांनी उदध्वस्त केले होते. त्याचे बांधकाम १६९० मध्ये महादजी राम तांबे यांनी केले. त्यावेळी त्यांनी गावातील मशिदिचीही दुरूस्ती केली. या देवालयाचा पुनरूदधार पाथर्डीचे खोत विष्णू व शिवराम गोपाळ तांबे यांनी शके १८०७ चे सुमारास केला. देवाची जीर्ण झालेली कांजणीमूर्ती बदलून दुसरी प्रतिष्ठापना करण्याकरिता नवीन घडवून आणली. या ग्रामदेवतची यात्रा देवदीपावलीस असते. पंचक्रोशीतील ग्रामदेवतांची भेट व स्नेहमीलन कार्यक्रम, रहाट चालविण्याचा कार्यक्रम हे या यात्रेचे वैशिष्टय होय.

पाथरेश्वर प्राचीन व जागृत देवस्थान आहे. देवालयाचे सर्व ताशीव चिरेबंदी काम पाथर्डीचे खोत लक्ष्मण गणेश तांबे यांनी त्यांचे उपाध्ये बाळकृष्ण भट व जनार्दन भटअंतरकर यांचे देखरेखीखालील करवून घेतले. देवालयाचा चौथरा जमिनीच्या पृष्ठभागापासून उंच उठावदार आहे. सभामंडपाच्या घुमटाची उंची गाभाऱ्यातीवरील घुमटापेक्षा कमी आहे. राघोबादादा पेशवे यांची पत्नी आनंदीबाई पाथर्डीला येऊन पाथरेश्वराचे दर्शन घेत असे. पाथरेश्वर मंदिराच्या पोवळीला लागूनच श्री पांडुरंगाचे मंदिर आहे. या मंदिराचे चिरेबंदी दगडाचे बांधकाम पाथर्डीचे खोत लक्ष्मण गणेश तांबे यांनी केले. देवाचे पुजेकरिता फुलझाडे, तुलसी, बेल या वृक्षांच्या लागवडीसाठी पाच बिघे पडजमीन श्रीमंत माधवराव नारायण पेशवे यांजकडून खोत लक्ष्मण तांबे यांना इनाम म्हणून मिळाली होती. त्यांचा ऐतिहासिक दाखला येथे

मिळतो तो असा आहे की 'सुमा सीतसबैनमया व अलक ६0२७ सफर शके १६९७ इ.स.१७७५ ची सनद लक्ष्मण तांबे मोकादम मामले हमजाबाद खोत मौजे पाथर्डी यांसी हवाली'. या जमिनीस इनाम म्हणून पांडुरंग देव यांचे नाव चालू आहे. 'पाथर्डी येथील गोपाळ अनंत तांबे यांचे पणतू हरी केशव तांबे यांचाही देवालय बांधणीत मोठा सहभाग आहे. या दुमजली देवालयाच्या बांधणीत लाकूडकामाचाही चांगला वापर केला आहे. मंदिराचे छत कौलाने शाकारलेले आहे. कृष्णाजी अनंत तांबे या बंधूद्वयांनी बांधलेल्या चौसूपी घरबंदराच्या उत्तरेकडील सोप्याच्या चौथऱ्यावर मंदिराची बांधणी आहे. दक्षिणेकडील चौथऱ्यावर सद्यस्थितीत त्यांचे नांदते घर असून मध्यभागी अंगण आहे. गावात भैरी देवी मंदिर असून लिंगूबाई, वाघजाइ, भैरीनाथ, जागेश्वर, सोमेश्वर असा पाचमूर्ती असलेली ग्रामदेवता पाथर्डी गावास कृपाशिर्वाद देत आहेत.



पाथर्डी येथील श्री पाथरेश्वर मंदिर



श्री पाथरेश्वर मंदिरातील शिवपींडी

**दोणवली गावचे सिध्दीविनायक मंदिर –**

चिपळूण तालुक्यातील दोणवली या निसर्गरम्य गावात पेशवेकालीन श्री सिध्दीविनायक मंदिर उभे आहे. मंदिराचा सभामंडप उघडा असून गाभारा बंदिस्त आहे. मंदिराची बांधणी जांभा दगड, गूळ, चुना इ. पासून केल्याचे जाणवते. मंदिराचे वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम

असलेल्या घुमटास कमलपुष्पा सारखा आकार दिला आहे. पूर्ण मंदिरावर सफेद चुन्याचा गिलावा आहे. गाभाऱ्यात उजव्या सोंडेची संगमरवरी पााषाणाची सिध्दीविनायक सुबक मूर्ती आहे मंदिरासमोर प्रशस्त काळया पाषाणाची चित्ताकर्षक विशाल पणती आहे.हे मंदिर इ.स.१७७४दरम्यान थोरले माधवराव पेशवे यांनी बांधले असा उल्लेख आहे. मंदिराचे मागीलबाजूस ओहोळावर असलेला मोठया आकाराच्या जांभा दगडापासून तयार केलेला अर्धवर्तुळाकृती ऐतिहासिक पूल अभ्यासकांचे कुतुहल वाढवतो. मंदिर परिसरातील आल्हाददायक वातावरण भाविकांच्या मनःशांतीस पूरक ठरते.





**गोविंदगड उर्फ गोवळकोटचा किल्ला –**

गोविंदगड किंवा गोवळकोटचा किल्ला या नावाने ओळखला जाणारा हा ऐतिहासीक डोंगरी किल्ला चिपळूण पासून १० कि.मी अंतरावर असलेल्या करंजेश्वरी मंदिरांच्या मागील बाजूकडील डोंगरावर उभारलेला आहे. हा किल्ला गोवळकोट या गावापासून अर्धा कि.मी.अंतरावर आहे.या डोंगराच्या डावीकडील बाजूला किल्ला तर उजवीकडील बाजूला आज चिपळूण नगर परिषदेचे पाणी पुरवठा केंद्र आढळते. किल्ल्याच्या खाडीकडील बाजूने किल्ल्यावर जाण्यासाठी रस्ता आहे तर करंजेश्वरी मंदिरांच्या आवारातून सुमारे तीनशे पायऱ्या चढून किल्ल्यावर पोहचता येते. या सर्व पायऱ्या सिमेंट–कॉक्रीटने डोंगरातून बांधून काढलेल्या आहेत.वळणावळणाच्या या मार्गाने पंधरा ते वीस मिनीटांमध्ये किल्ल्यावर पोहचता येते.

सुमारे दोन एकर एवढया क्षेत्रफळावर उभारलेला हा किल्ला उत्तर दक्षिण १०९ मी. आणि पूर्व पश्चिम १३९ मी.अशा आकाराचा असून तो गढीच्या स्वरूपात आहे. ज्या टेकडीवर हा किल्ला उभारलेला आहे तिची उंची १५० फूट आहे.उत्तरेकडून वहात येणाऱ्या वाशिष्ठी नदीने किल्ल्याला वेढा घातला आहे तर इतिहासकाळात एका बाजूला खंदक खोदलेला होता त्यामुळे किल्ला संरक्षित केलेला होता. गोवळकोट या नजीकच्या बंदराकडे जाताना दिसते की किल्ला ऐन कोंडीत उभारलेला आहे. चिपळूण हे दाभोळ बंदराकडे जायचे व्यापारी मार्गावरील मुख्य ठिकाण असल्याने व्यापाराच्या संरक्षणाकरीता या किल्ल्याची उभारणी झाली होती. किल्ल्याचे प्रवेशद्वार आज जागेवर शिल्लक नाही पण किल्ल्यात प्रवेश करण्याकरीता पूर्वेकडे व पश्चिमेकडे असे दोन दरवाजे होते अशा खुणा आढळतात. पूर्वेकडील दरवाजा हा मुख्य दरवाजा होता तर पश्चिमेकडील दरवाजा दुय्यम स्वरूपाचा होता. मात्र पश्चिमेकडील दरवाज्यातून थेट बंदरापर्यंत पायऱ्या आहेत.वस्तूची नेआण करण्याकरीता सोयीचे व्हावे म्हणून या पायऱ्या तयार केल्या असाव्यात. किल्ल्याला आजही पूर्ण तटबंदी आहे. पूर्वे कडील तटबंदी व बुरूज आजही मजबूतपणे उभे असलेले आढळतात. किल्ल्याची तटबंदी षटकोनी आकारात उभारलेली असून तीची जोडणी काळया पाषाणात चुन्याने केलेली आहे. किल्ल्याला एकूण सात बुरूज आहेत व ते अर्धचंद्राकृती आहेत.तटबंदीच्या आतील किल्ला सध्या अगदी मोकळा आहे व त्यामधे विस्तृत मैदान आहे.किल्ल्यात केवळ पडक्या इमारतींचे चौथरे पहावयास मिळतात. चौथऱ्याच्या

प्रकारावरून दक्षिणेकडील चौथरे हे कोठाराचे आणि उत्तरेकडील पाण्याच्या टाक्यांजवळील चौथरा म्हणजे कल्लेदाराची जागा व पूर्वेकडील चोथरे हे पहारेकारी व इतरांची निवासस्थाने असावीत अशी रचना दिसते . या किल्ल्याच्या मागील बाजूला हत्तीच्या पाठीच्या आकाराचे उभे टेकाड आहे की ज्यावर चढल्यानंतर किल्ल्याचा संपूर्ण परिसर व आजूबाजूचा विशाल प्रदेश नजरेत येतो हे टेकाड टेहळणीचे टेकाड म्हणून ओळखले जाते . गडाचा पश्चिमेकडील तटही या टेकाडापेक्षा कमी उंचीचा आहे . किल्ल्याच्या पश्चिमेकडील बाजूस शिवपिंडीच्या आकाराची एक पाण्याची सोय असणारी विहिर आहे . या विहिरीचा आकार १८*१५मीटर लांब व ६ मीटर खोल असा आहे . या विहिरीत उतरण्याकरीता सोळा पायऱ्यांची सोय केलेली आहे . याच्या शेजारी एक लहान तळे असून सद्यस्थितीत ते गाळाने भरले आहे . गडाच्या दक्षिणेकडे असणाऱ्या भिंतीत एका खोलगट जागी भवानी देवीचे देऊळ आहे . किल्ल्याच्या परीसरात पाच तोफा आढळतात . १४० * ०.७५ व १.९० * ०.८० मीटर आकाराच्या या तोफा आहेत . किल्ल्याच्या एकूण रचनेवरून त्याची दोन वेळा उभारणी झाल्याचे सबळ पुराव तेथे आढळतात . किल्ल्याच्या पूर्वेकडील भागात मूळ किल्ल्याचे अवशेष नाहीत त्या ठिकाणी सध्याच्या तटबंदीला लागून पण वेगळया तटबंदीच्या पायाचे दोन स्तरातील पाषाण उत्तर दक्षिण बघावयास मिळतात . सुरवातीचा किल्ला आकाराने मोठा असावा हे त्या अवशेषावरून दिसून येते . सध्याच्या किल्ल्याची सुध्दा दोन वेळा डागडूजी झाल्याचे स्पष्ट निर्देश तटबंदीत दिसतात .

गोवळकोटच्या किल्याची उभारणी कोणी व केव्हा केली असावी याबाबत निश्चित पुरावे उपलब्ध नाहीत . सदर किल्याचे स्थापत्य आणि चिपळूण परिसरात मिळालेले पुरावशेष यावरून मूळ किल्ला हा शिलाहार राजवटीत इसवी सनाच्या १० व्या शतकात उभारला गेला असावा असे मत मांडले जाते . विजापूरच्या आदिलशाहीच्या अमदानीत या किल्ल्याची पुनरबांधणी झाली असावी . काही काळ सदर किल्ला शिवाजी महाराजांच्या ताब्यात राहिला होता त्यावेळी इ . स . १६७० मधे त्याची डागडूजी केली होती . जंजिऱ्याच्या हबशांच्या काळात १६९० मधे पुन्हा या किल्ल्याची डागडूजी झाली . इ . स . १७४४ मधे तुळाजी आंग्रे यांनी जंजीऱ्याच्या सिद्दींकडून किल्ला ताब्यात घेतला . पेशव्यांच्या वर्चस्वाखाली हा किल्ला १७५५ पासून १८१८ पर्यंत होता . तुळाजी आंग्रे यांनी या किल्ल्याला गोविंदगड नाव दिल्याचे मत काही अभ्यासक व्यक्त करतात . पेशवाईच्या अस्तानंतर हा किल्ला इंग्रजांच्या हाती गेला . किल्ल्याची तटबंदी, चौथऱ्याचे भग्न अवशेष, पाणी पुरवठयाची सोय, तेथे विखूरलेल्या तोफा,या गोष्टींवरून हा किल्ला मध्ययुगीन कालखंडात समृध्द व सुसज्ज होता असे अनुमान काढता येते .



चिपळूण तालुक्यातील गोवळकोट हा किल्ला अतिशय नयनरम्य अशा ठिकाणी उभारण्यात आला आहे . घाटमाथ्यावरून चिपळूण मार्गे दाभोळ बंदरातून जो व्यापार चालत असे त्या व्यापारावर देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने गोवळकोटचा किल्ला अतिशय महत्त्वाचा होता . या किल्ल्याची सद्यस्थिती मात्र दयनीय आहे . किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी ढासळलेली आहे . किल्ल्यावरील ऐतिहासीक खूणा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत . पावसाळयात गुरांचे चरावू ठिकाण तर एरवी मुलांचे क्रिकेटचे मैदान अशी या ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणाची अवस्था आहे .

**ओवरी – कोळकेवाडीची लेणी –**

चिपळूण पासून कराडच्या दिशेला २५ किमी अंतरावर कोळकेवाडी येथे धरण आहे . त्याजवळच्या जंगलातील सह्याद्री पार्व तरांगात समुद्रसपाटीपासून ८०० मीटर उंचीवर बारा खोदीव गुहा किंवा लेणी आहेत . ही लेणी बाराराव कोळयांचे गुप्त निवासस्थान मानतात . ओवरी, कलावंतिणीचा महाल या नावाने सुध्दा स्थानिक लोकांमध्ये हे ठिकाण ओळखले जाते . मूळ कोळकेवाडी गावातील भीमेश्वर मंदिरापासून लेण्यांपर्यंत पाखाडी आहे . लेण्यांच्या मध्यभागी सभामंडप आहे . या जागेवरून गोवळकोट खाडी, तिवरे घाटी, व नांदिवसे येथील भैरकाठीचा किल्ला दिसतो .

कोळकेवाडी येथील लेण्यांमध्ये फार कलाकुसरीचे शिल्पकाम नाही . मात्र प्रत्येक गुहेत काही ठळक गोष्टी आढळतात . पश्चिमेकडे असणाऱ्या लेणे क्र . ०१ चा आकार १२ मीटर लांब व ०८ मीटर रूंद आहे . तर उंची ०२ मीटर आहे . मध्यभागातील तुटक्या खांबांचे अवशेष येथे दिसतात शिवाय काही भग्न शिल्पे व नंदी येथे आहे . लेणे क्रमांक ०२ ची लांबी १२ मीटर रूंदी ०५ मीटर तर उंची ०३ मीटर आहे . लेणे क्रमांक ०३ १० मीटर लांब ०५ मीटर रूंद तर ०५मीटर उंच आहे . लेणे क्रमांक ०४ हे ०४ मीटर लांब ०२ मीटर रूंद व ०४ मीटर उंच आहे . या लेण्यामध्ये पाण्याचा स्त्रोत आढळतो . लेणे क्रमांक ०५ हे वैशिष्टयपूर्ण असून ते दुमजली आहे . याच्या बाहेरील भाग ०७ मीटर लांबीचा तर आतील दालन ०७ मीटर लांब आहे . या लेण्यात कमळ फुलांची नक्षी आहे . लेणे क्रमांक ०६ हे ०७ मीटर लांब ०५ मीटर रूंद आहे हे लेणे क्रमांक ०५ ला आतून जोडलेले आहे या लेण्यात बाहेरून प्रवेश करणे अवघड आहे . लेणे क्रमांक ०७ हे ०४ मीटर लांब ०३ मीटर रूंद व ०७ मीटर उंच आहे . लेणे क्रमांक ०८ हे ०३ मीटर लांब व रूंद आहे तर उंची ०२ मीटर आहे . लेणे क्रमांक ०९ ते १२ हा लेणेसमूह एका उभ्या कडयात अवघड जागी आहे त्यापैकी लेणे क्रमांक ०९ हे पूर्ण ढासळलेले आहे . या सर्व लेण्यांच्या डोंगर माथ्यावर कमरेवर हात ठेवलेल्या अवस्थेतील काही शिल्पे आहेत . जमिनीत पुरला गेलेला वीरगळ व काही उध्वस्त खोल्यांचे अवशेष येथे आढळतात .

कोळकेवाडी येथील लेणी परिसर अरण्यमय आहे . या भागात विविध वनौषधी व वन्य प्राण्यांचा वावर आहे . सभोवताली दरी असल्याने कोरीव लेणी समूहाच्या माथ्यावरील चढणीचा मार्ग आव्हानात्मक आहे त्यामुळे साहसी पर्यटकांसाठी हे ठिकाण एक आकर्षण आहे .

**संदर्भ –**

१ . जिल्हा सामाजिक व आर्थिक समालेचन रत्नागिरी जिल्हा २००० - २००१ अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन मुंबई . पृष्ट क्र . ०१

२ . चिपळूण तालुका पर्यटन विशेषांक, वाटेकर धीरज, कोवळे समीर, श्री परशुराम निसर्ग पर्यटन केंद्र प्रकाशन,२००८, पृष्ट क . २३

३ . चिपळूणच्या आठवणी, सौ . देवधर स्मिता, विनीत प्रकाशन चिपळूण, २००४, पृष्ट क . ०८

४ . मराठी विश्वकोर्श जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मण (संपा .), खंड पाच व खंड नऊ महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतीक मंडळ, मुंबई प्रथमवृत्ती १९७७

५ . चिपळूण नगर परिषद शतसांवत्सरीक महोत्सव स्मरणिका, वर्ष १९७७

६ . Gazeteer of the Bombay Presidency (Ratnagiri and Sawantwadi) Vol.-X¸The Government Photozinco Press, Pune¸ 1996, Page No. 325

७ . कोकण पर्यटन – संपा . मंदार नेरूरकर, आयडीयल प्रकाशन मुंबई २००८ पृष्ठ क्र ४४ ते ५२

८ . भारद्वाज – कोकण पर्यटन विशेषांक – संपा . आल्हाद गोडबोले, दै . प्रहार प्रकाशन २०११

९ . कोकण दर्शन – र . य . साने विद्या विकास प्रकाशन नागपूर पृष्ठ क्र ०५

१० . महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे – प्रा . सु . ह . जोशी, डायमंड पब्लिकेशन पुणे २०१० पृष्ठ क्र

११ . वेध दुर्गांचा – भगवान चिले, शिवस्पर्श प्रकाशन कोल्हापूर २००८ पृष्ठ क्र १७१

१२ . समग्र कोकण दर्शन – श्रीनिवास घैसास, मनोरमा प्रकाशन मुंबई २००६पृष्ठ क्र २३१ ते २४१

१३ . कोकणातील पर्यटन – प्र . के . घाणेकर,स्नेहल प्रकाशन पुणे २०१२ पृष्ठ क्र ११३ ते १३१

१४ . चला सहलीला – पांदुरंग पाटणकर, स्नेहल प्रकाशन पुणे २००४ पृष्ठ क्र १३९

१५ . आडवाटेवरचा महाराष्ट्र – प्र . के . घाणेकर,स्नेहल प्रकाशन पुणे ११९६ पृष्ठ क्र ५० ते ५५

१६ . शोध अपरान्ताचा – अण्णा शिरगांवकर, बुकमार्क पब्लिकेशन पुणे २०१२